अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ८ / २०१०.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १९-०३-२०१०.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक ८ , दिनांक २३-०३-२०१०.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती...............................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा मंगळवार दिनांक २३-०३-२०१० रोजी दुपारी १-०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक ८ मंगळवार दिनांक २३-०३-२०१० रोजी दु. १.०० वां होणा-या मा.खास सभेची

**विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ४५ | दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४६ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध महत्वाचे रस्ते " नागरी दळणवळण साधनांचा विकास " अंतर्गत करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ४७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १९-०३-२०१०.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४५** **दिनांक : २३ / ०३ /२०१०.**

---

| अ. नं. | विषय |
|---|---|
| १ | अहमदनगरचे रहिवासी व पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार वसंतराव सदाशिव काणे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | विश्व हिंदू परिषद माजी शहराध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते पोपटशेठ मुथा यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर येथील हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष रत्नाकर दसरे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | ज्येष्ठ गायक व संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक-अभिनेते उदयराज गोडबोले यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | मराठीतील नामवंत कविता, बालसाहित्य, समीक्षण, अनुवादिक साहित्य अशा साहित्य क्षेत्राच्या विविध प्रांतात मुशाफिरी करणारे ज्यंष्ठ साहित्यिक गोविंद विनायक उर्फ विंदा करंदीकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | सहकार नेते व थोर स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब संतूजी थोरात यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | जुने ट्रान्सपोर्ट व्यावसायिक कै.अमरजितसिंग संतसिंग वाही यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | कै.नारायण लक्ष्मण सहाणे, शहा कॉलनी यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | माजी प्राचार्य कै.गणपतराव भालसिंग, श्रीकृष्णनगर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | सिताबाई बबनराव ससाणे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | नारायण आत्माराम धुमाळ यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | कंचनबाई झुंबरलालजी उर्फ पोपटशेठ बोथरा यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

---*---

ठराव : दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ४६** **दिनांक : २३ / ०३ /२०१०.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध महत्वाचे रस्ते " नागरी दळणवळण साधनांचा विकास " अंतर्गत करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

देशामध्ये वाढत्या लोकसंख्येचा विचार करता नागरीकरणाचा वेग शहरामध्ये झपाटयाने होत आहे. त्यामुळे राज्यातील नागरी भागांचा नियोजित पध्दतीने विकास करण्यासाठी दिर्घकालीन गरजांचा विचार करुन शहरातील पायाभूत सुविधा निर्माण करणे हे या अभियानाचे उद्दीष्ठ आहे. त्यानुसार मा.शासनाच्या संदर्भीय निर्णयानुसार राज्यातील नागरी मा.शासनाने विहीत केलेल्या मानकांप्रमाणे विविध मुलभूत सुविधा पुरविणे आणि तेथे शहराच्या दर्जाप्रमाणे शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभूत सुविधांची निर्मीती करणे तसेच शहराच्या सामाजिक सुविधा व सौंदर्य आकर्षनामध्ये वृध्दी करणे ही महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानासाठी प्रमुख उद्दीष्ठ आहे. सदर अभियानाअंतर्गत कामाचा समावेश करण्यासाठी काही महत्वाच्या पध्दतीने अनुपालन करण्याचे बंधनकारक आहे. त्या अंतर्गत शहराच्या पुढील २० वर्षाच्या संभाव्य विकास कामांचा विचार करुन शहर विकास आराखडा (सी.डी.आर) तयार करणे अनिवार्य आहे. तसेच संदर्भीय मा.शासन निर्णयाच्या परिशिष्ट II मध्ये विविध नागरी सेवांसाठी शासनाने विहीत केलेली मानकाचे अनुपालन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये पाणीपुरवठयाचे ९ मानके, मलनिस्सारण व स्वच्छतेचे ९ मानके घनकचरा व्यवस्थापनाचे ८ मानके व पर्जन्य जलवाहिन्यांचे २ मानके त्यांचे आवश्यक न्युनतम गुणवत्ता व तयांचे एकक नमूद केलेले आहेत. त्याचप्रमाणे अनुपालन करणे गरजेचे आहे.

तसेच संदर्भीय मा.शासन निर्णयामधील मुद्दा क्र.५ मधील नमुद केलेल्या प्रमुख सुधारणांचे १२ मुद्दे अंगिकारणे आवश्यक आहे. त्यापुढील प्रमाणे

१) व्दि नोंद लेखी पध्दतीचा अवलंब करणे
२) महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे
३) मालमत्ता कर विषयक सुधारणा
४) उचित उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा
५) नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षित निधीची तरतुद करणे
६) नागरी क्षेत्रातील गरीबांच्या वस्त्यांना आवश्यक नागरी सुविधा पुरविणे
७) पर्जन्यजल संचय (Rain Water Harvesting)
८) सांडपाण्याचा पुर्नवापर
९) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.
१०) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात उर्जा बचतीच्या उपाययोजना राबविणे.
११)सार्वजनिक खाजगी सहभाग (पीपीपी) तत्वावर आधारीत प्रकल्पांना / उपाययोजना

१२) प्रशासकीय सुधारणा.

सविस्तर आराखडे करणेसाठी मा.शासनाचे एम.यु.आय.डी.सी.एल.म्हणजे महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमीटेड ही शासन प्रणित कंपनी स्थापन केलेली आहे. यामध्ये सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्याची नसलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रकल्प विकासासाठी मदत करेल व या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करण्यासाठी एम.यु.आय.डी. सी.एल.मध्ये प्रकल्प विकास निधी (प्रोजेक्ट डेव्लपमेंट फंड) कार्यान्वित केलेला आहे व जी नागरी संस्था एम.यु.आय.डी.सी.एल.ला प्रकल्प विकसीत करण्यासाठी विनंती करेल त्यांना ही संस्था मदत करेल. परंतु अशा परिस्थितीत प्रकल्प विकासासाठी झालेल्या खर्चाचा २५% रक्कम सेवा शुल्क म्हणुन एम.यु.आय.डी.सी.एल. ला अदा करणे आवश्यक राहील.

सदर प्रस्तावांना मंजूरी देताना संबंधित नागरी स्थानिक संस्थेने सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेल्या सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य करणे बंधनकारक आहे व त्याबाबत ठराव करणे बंधनकारक आहे. सदर महाअभियाना अंतर्गत प्रकल्प अहवालाचे तांत्रिक मुल्यमापनाची व्यवस्था शासकीय यंत्रणेमार्फत करावी लागेल उदा.सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व त्यांचे मुल्यमापनासाठी प्रकल्प खर्चाच्या ०.२५% पर्यंत मुल्यमापन फी मुल्यमापन यंत्रणेस आकारण्याची मुभा राहील.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत अथ सहाय्य तीन प्रकारात राबविता येईल.

१) पुर्णत: सार्वजनिक खाजगी सहभागातून

२) सार्वजनिक खाजगी सहभागातून पुर्णत: न होणारे प्रकल्प हे वर्धनक्षम होण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करण्याकामी अनुदान कर्ज मंजूर करुन

३) सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर न राबविता येणा-या प्रकल्पामध्ये अनुदान व कर्ज मंजूर करणे यामध्ये प्रथमत: अहमदनगर महानगरपालिकेस प्राधान्याने प्रथम मुद्यांप्रमाणे सदर प्रस्ताव खाजगी करणातून पुर्ण करणेसाठी जाहीर निविदा मागवावी लागेल व बांधा वापरा हस्तांतरीत करा या योजनेमध्ये काम करता येईल. सदर प्राधान्य क्र.१ मध्ये प्रस्तावास प्रतिसाद न मिळाल्यास प्राधान्य क्र.२ नुसार खाजगीकरणासाठी येणा-या तुटीची मंजूरी घ्यावी लागेल व प्राधान्य क्र.१ व २ मध्ये प्रतिसाद न मिळाल्यास प्राधान्य क्र.३ नुसार मा.शासनाकडे अनुदान व कर्ज मंजूरीसाठी प्रकल्प सादर करावा लागेल यामध्ये अहमदनगर महानगरपालिका ही ड वर्ग महानगरपालिका आहे. त्यामुळे मुद्दा क्र.६ मधील तक्ता क्र. क नुसार अहमदनगर महानगरपालिका ५०% अनुदान व ५०% कर्ज एम.यु.आय.डी.सी.एल.किंवा एम.एम.आर.डी.ए. मार्फत मंजूर होईल. यामध्ये संबंधित नागरी संस्थेने स्वत:च्या निधीतुन काही रक्कम मंजूर प्रकल्पावरील खर्चापोटी उपलब्ध करणे आवश्यक आहे. या अभियानाअंतर्गत मंजूर प्रकल्पासाठी स्वरुपातील रक्कम एम.यु.आय.डी.सी.एल. या कंपनी मार्फत उपलब्ध होईल. सदर प्रकल्प मंजूरीमध्ये प्रकल्प मंजूरीतील ५०% रक्कम अनुदानाची प्रशासकीय मंजूरी नगर विकास विभागामार्फत होईल व उर्वरीत ५०% ही रक्कम एम.यु.आय.डी.सी.एल. कडील तत्वत: मान्यतेनंतरच वितरण होईल. सदर अनुदान हे दोन टप्प्यात होईल. अनुदानाच्या ५०% ही प्रकल्प मंजूरी नंतर वितरीत होईल व उर्वरीत ५०% अनुदान हे प्रकल्प खर्चाचे ७०% रक्कम खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्रानंतर वितरीत होईल. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रमुख रस्त्यांचे विकास करणे गरजेचे आहे.

त्यानुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती महाअभियान उद्दीष्ठातील अनुक्रमांक १ मधील नागरी दळणवळण साधनांचा विकास या अंतर्गत रस्ते व पूल बांधणे या लेखाशिर्षकाखाली काम करता येईल यामध्ये खालील महत्वाच्या रस्त्याचा समावेश करणे संयुक्तीक वाटते.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | यश पॅलेस ते कोठी रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणासह इतर सुधारणा कामे करणे | १२.०० कोटी |
| २ | बालिकाश्रम रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण गटार व विद्युत व्यवस्थेसह काम करणे | ६.५५ कोटी |
| ३ | गुलमोहर (महाराजा हॉटेल ते ऋणानुबंध अपार्टमेंट) रस्ता रुंदीकरण, मजबुतीकरण जलनिस्सारण व विद्युतीकरणासह करणे | ४.२० कोटी |
| ४ | पाईपलाईन रस्त्याचे रुंदीकरण, मध्यभागी विद्युतीकरण फुटपाथ व पुलाच्या रुंदीकरणासह डांबरीकरण करणे | ३.१९ कोटी |
| ५ | मनमाड रोड सत्यम हॉटेल ते भुतकरवाडी पंपींग स्टेशन पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण करणे पुलाच्या कामासह करणे | २.५० कोटी |
| ६ | गुलमोहर पोलिस चौकी ते श्रीराम चौक रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे | १.३९ कोटी |
| ७ | प्रभाग क्र.५१ व ५२ मध्ये ९.०० मी. उंचीचे ट्युबलर पोल अंडरग्राउंड वायरिंगसह उभारणे व १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींगा बसविणे | ०.५० कोटी |
| | एकुण | ३०.३३ कोटी |

अहवालाप्रमाणे वरील प्रस्तावांची एकुण अंदाजित रक्कम रु.३०.३३ कोटी एवढी होती. सदर कामासाठी प्रकल्प मंजूर करताना प्रथम सार्वजनिक खाजगी सहभागातून काम करण्यासाठी जाहीर निविदा मागवुन काम करावे लागेल तसेच सदर खाजगीकरणामध्ये काही रक्कमेची तुट लागल्यास त्यासंबंधिचा प्रस्ताव मंजूरीसाठी द्यावा लागेल. वरील कामांच्या मंजूरीसाठी मा.महासभेची मान्यतेची व ठरावाची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पाअंतर्गत खाजगी तत्वावर निविदा मागवुन काम करण्यास किंवा त्यास प्रतिसाद न मिळालयास अनुदान व कर्जासाठी प्रस्ताव मा.शासनाकडेस पाठविणेस मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट मा.महासभेपुढे पाठविणेस्तव सविनय सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे प्रस्तावानुसार सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मान्यतेसाठी पाठविण्यास सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे मा.महासभेसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणे योग्य राहील.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित मा.महासभेकडे मंजुरीसाठी पाठविणेकरीता मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, महासभेपुढे पाठवा.

यावर मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), मुख्यलेखाधिकारी, अंतर्गत लेखापरिक्षक यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

मा.श्री.अंबादास पंधाडे :- अहमदनगर शहराला १०० वर्षाचा इतिहास आहे. यापुर्वी नगर शहरासाठी शासनाकडुन एवढया मोठया प्रमाणावर कधीही निधी मिळालेला नाही. आज आपल्याला ४० कोटी निधी मंजूर झालेला आहे. प्रथमत: मी मा.अरुणकाका जगताप यांचे व मा.आयुक्त सो, यांचे अभिनंदन करतो. ४० कोटी मध्ये नगर शहरातील बरेचशे रस्ते चांगल्या प्रमाणात होतील. या रस्त्याच्या दुर्दशे मुळे काहींना आपले प्राण गमवावे लागले आहेत. अनेक लहान-मोठया दुर्घटना घडत आहेत. या निधीमधुन रस्ते तयार करतांना प्रथमत: रस्त्यावरील अतिक्रमण काढुन रस्ता रुंदीकरण करुन गटार व लाईट व्यवस्थेसह रस्त्याची कामे करावीत. बालिकाश्रम रस्ता हा वर्षानुवर्षे तसाच आहे. रस्ते रुंदीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. रस्त्यांवरील अतिक्रमण काढतांना मा.आयुक्त सो यांनी पाठपुरावा करुन रस्त्यावरील अतिक्रमण काढावेत. आजच्या विषयाला कुणीही सदस्यांनी विरोध करु नये. यामुळे नगर शहर चांगले होईल.

मा.सौ.संगिता खरमाळे :- अहमदनगर शहराच्या विकासाकरीता एवढया मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल प्रथमत: मी मा.महापौर व मा.आयुक्त सो, यांचे अभिनंदन करते. सदर कामाकरीता आपणा सर्वांना आमचा पाठींबा आहे. पण तत्पुर्वी गुलमोहोर रोड व गुलमोहोर पोलिस चौकी ते श्रीराम चौक रस्ता या रस्त्यांबाबत वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीचा मा.आयुक्त सो, यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त सो :- नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक २० फेब्रुवारी २०१० चे शासन निर्णयानुसार शहरातील महत्वाचे १५ मीटर पेक्षा जास्त रुंदीचे रस्ते घेतलेले आहेत. तसेच सावेडी भागातील भुयारी गटार योजना मंजूर झाली आहे. सदर योजनेच्या कामाचा लवकरात लवकर शुभारंभ करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या तयार केलेले रस्ते भुयारी गटार योजना कामासाठी उखडले जातील भुयारी गटार योजनेचे काम मार्गी लागल्यानंतर सावेडी भागातील महत्वाचे रस्ते रुंदीकरणासह डांबरीकरण करणेत येतील.

मा.सौ.संगिता खरमाळे :- १५ वर्षापासुन सावेडी भुयारी गटार योजना कार्यवाही चालू आहे. प्रत्यक्षात काहीही काम झालेले नाही. सावेडी परिसरातील गुलमोहोर रोड हा दोन्हीही बाजुनी अतिक्रमण होवुन अतिशय अरुंद झालेला आहे. सदर रस्त्यावरील अतिक्रमणे काढुन रस्ता रुंदीकरणासह डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर रस्त्यावर नेहमी सतत लहान-मोठया प्रमाणात अपघात घडत असतात. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त सो :- सावेडी भुयारी गटर योजनेचे काम पुर्ण झालेनंतर पुढील वर्षी रस्तारुंदीकरण डांबरीकरणाची कामे केली जातील. त्यामुळे आजच्या सभेमध्ये सदर भागातील रस्त्याची कामे वगळण्यात आलेली आहेत.

मा.श्री.अरुणकाका जगताप :- ब-याच वर्षापासुन प्रलंबित असलेली सावेडी भुयारी गटार योजना मंजूर झालेली आहे. सदर योजनेचे काम लवकरात लवकर सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे तेथील कामे तात्पुरती करता येणार नाहीत. सावेडी विभागाकरीता भुयारी गटार योजना होणे हे आवश्यक आहे. भुयारी गटार योजनेच्या कामासाठी निधीचा पहिला हप्ता मार्च अखेर येणार आहे.

मा.सौ.मालन ढोणे :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील २० फेब्रुवारी २०१० चे निर्णयानुसार महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभुत व सामाजिक सुविधा निर्मिती करणे करीता शहर विकास आराखडा तयार करावा लागेल. मा.शासनाने विहित केलेल्या मानांका प्रमाणे विविध मुलभुत सुविधा पुरविणे आणि तेथे शहराच्या दर्जाप्रमाणे शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभुत सुविधांची निर्मिती करणे. सदर अभियानांतर्गत कामाचा समावेश करण्यासाठी काही महत्वाच्या पध्दतीने कायद्याचे अनुपालन करणे बंधनकारक आहे. पुढील २० वर्षाचा संभाव्य विकास कामांचा विचार करुन आराखडा तयार करणेंत यावा. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत करावयाच्या कामांकरीता मा.शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या प्रमुख सुधारणांचे १२ मुद्दे अंगिकारणे आवश्यक आहे. या १२ मुद्यांचे स्पष्टीकरण करण्यात यावे.

मा.आयुक्त सो :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत सर्व क्षेत्रामध्ये कामे प्रस्तावित करता येतात. शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील तक्त्यातील क्रमांक १ ते ७ येथील पायाभुत सुविधांशी निगडीत प्रकल्पांच्या मंजुरीसाठी एक समिती व तक्त्यातील क्रमांक ८ ते १२ येथील विषयांशी निगडीत प्रकल्पांच्या मंजूरीसाठी एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. २० तारखेला मंत्रालयात सदर कार्यक्रमा बाबत बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्या बैठकीमध्ये रस्ते लाईट याच कामांसंदर्भात नियुक्त केलेल्या समितीची बैठक झालेली आहे. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे कामांचे प्रस्ताव तयार करुन पाठवावयाचे आहेत.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- अहमदनगर शहराच्या विकासाकरीता एवढया मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल प्रथमत: मी मा.महापौर व मा.आयुक्त सो, यांचे अभिनंदन करतो. महानगरपालिकेस प्रथमत: एवढया मोठया प्रमाणावर निधी मिळालेला आहे. सावेडी भुयारी गटार योजनेची श्रीमती.खरमाळे यांची मागणी योग्य आहे. गेल्या १५ वर्षापासुन आम्ही भुयारी गटार योजनेसाठी पाठपुरावा करीत आहोत. सदर योजनेसाठी निधी मंजूर झालेला आहे. सदरची योजना तातडीने मार्गी लावावी व आजच्या नगरोत्थान अभियान कार्यक्रमा अंतर्गत करावयाच्या कामाच्या ठरावास सर्वांनी पाठींबा द्यावा.

मा.श्री.निखिल वारे :- गुलमोहोर रोड हा डी.पी.रोड आहे. सदरचा रोड हा दोन्ही बाजुंनी अतिक्रमण झाल्याने अतिशय अरुंद झालेला आहे. सदर रस्त्यावर नेहमी मोठया प्रमाणावर वाहतुक चालू असते. सदर रस्त्यावर काही ठिकाणी विद्युत खांब नसल्याने तेथे लाईटची व्यवस्था नाही. त्यामुळे तेथे अंधार असतो. महिलांना व मुलांना रात्री जाणे-येणे अवघड होत आहे. चो-यांचे प्रमाण वाढत आहे. गुलमोहोर रोड व पाईपलाईन रोड रुंदीकरणासह डांबरीकरण करणे बाबतचे काम प्राधान्याने करण्यात यावे.

मा.श्री.आरीफ शेख :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत करावयाच्या कामां बाबत बरीच साधक-बाधक चर्चा झालेली आहे. सदर अभियाना अंतर्गत खालील कामांचा समावेश करण्यात यावा.

| अ.नं. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | लालटाकी नेहरु पुतळा ते सर्जेपुरा चौक ते रामवाडी ते फलटण पोलिस चौकीपर्यंत रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण आवश्यक त्याठिकाणी फुटपाथ व विद्युतीकरणासह करणे. |
| २ | अमरधाम रस्त्यावरील वेताळबाबा मंदिर ते एम.एस.ई.बी. सबस्टेशन पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण विद्युतिकरणासह करणे. |
| ३ | प्र.क्र.१६ मध्ये झोपडीकॅन्टीन ते लक्ष्मीमाता मंदिरापर्यंत ९ मीटर उंचीचे टयुबलर पोल, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व अंडरग्राउंड वायरींग करणे. |
| ४ | अहमदनगर शहरालगतच्या राष्ट्रीय महामार्गावरील १) कायनेटीक चौक ते महामार्ग पोलीस चौकी २) डी.एस.पी.चौक ते औरंगाबाद रोड वरील मनपा हद्दीपर्यंत ३) पत्रकार चौक ते मनमाड नाक्यापर्यंत ४) अरणगाव चौक ते दौंड रोड वरील जकात नाक्यापर्यंत ५) नेप्ती चौक ते कल्याण नाक्यापर्यंत ६) गुलमोहर रोड पोलीस चौकी ते श्रीराम चौक ते भगवान बाबा चौक, निर्मलनगर ७)औरंगाबाद हायवे ते गांडुळ खत प्रकल्प ते राजळे बंगला ८) समतानगर पारिजात कॉलनी ते एकविरानगर ते तपोवन रस्ता ते शिरसाठ मळा रोडपर्यंत रस्त्याच्या मध्यभागी ९ मी. उंचीचे टयुबलर पोल, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व अंडरग्राउंड वायरींग करणे व औरंगाबाद रोड वरील लक्ष्मीनगर, हिम्मतनगर श्रीराम चौक ते वसंत टेकडी ते संदेशनगर अंतर्गत ४० वॅट टयुब फिटींग बसविणे, पोल उभारणे व स्ट्रीट लाईट कंडक्टर ओढणे. |
| ५ | औरंगाबाद रस्त्यावरील वन विभागापासुन शहा शरीफ दर्गापर्यंत रुंदीकरणासह डांबरीकरण व विद्युतीकरण करणे. |
| ६ | औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यंत रस्त्याचे रुंदीकरणासह डांबरीकरण करणे (सदर रस्त्यावरील पक्क्या घरांचे अतिक्रमण काढणे आवश्यक आहे.) |
| ७ | मुकुंदनगर भागातील शितल कॉलनी कोपरा ते कोठारी कॉम्प्लेक्स ते भिंगार नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटर करणे. |
| ८ | मनपा हद्दीतील प्रेमदान चौक, सक्कर चौक, एस.टी.स्टॅण्ड चौक, मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, अप्पु हत्ती चौक, राज चेंबर चौक याठिकाणी अद्यावत स्वयंचलित नविन सिग्नल बसविणे. |

मा.श्री.संजय गाडे :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत राबवावयाच्या कामामध्ये वरील १ ते ८ कामांचा समावेश करणेत यावा व मा.श्री.आरीफ शेख, सभागृह नेता यांनी सुचविलेल्या कामांस मी अनुमोदन देत आहे. ठराव मंजूर करण्यात यावा.

**---*---**

**ठराव :-**

१) मा.शासन निर्णय क्र.एन यु आर २००८/प्र.क्र.२०३/नवि-३३ नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २०/०२/२०१० अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या अंतर्गत राज्यातील नागरी भागांचा दिर्घकालीन गरजांचा विचार

करुन शहराचा सुनियोजीत विकास साधण्याचे शासनाचे उद्दीष्ट आहे. सदर अभियानांतर्गत मा.शासनाने निर्गमीत केलेला उपरोक्त शासन निर्णय सभेपुढे ठेवुन त्याचे वाचन करण्यात आले. सदर शासन निर्णयानुसार पायाभुत सुविधांच्या विकासाबाबत एक ते बारा क्षेत्र ठरविण्यात आलेले आहेत. त्या अंतर्गत प्राथम्य क्र.१ खाली येणा-या क्षेत्रासंबंधी महानगरपालिकेने प्रस्ताव तयार करुन त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यामध्ये खालील कामांचा प्रस्ताव मा.शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | यश पॅलेस ते कोठी रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण, विद्युतीकरण व कॉंक्रीटीकरणासह इतर सुधारणा कामे करणे | १८१२.०० |
| २ | बालिकाश्रम रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण गटार व फुटपाथसह विद्युत व्यवस्थेसह काम करणे | ८६२.४० |
| ३ | पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुजाचे रुंदीकरण करणे रस्त्याच्या मध्यभागी विद्युतीकरण करणे. | २००.०० |
| ४ | मनमाड रोड सत्यम हॉटेल ते भुतकरवाडी पंपींग स्टेशन पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण पुलाच्या कामासह करणे | ३००.०० |
| ५ | महानगरपालिका हद्दीतील विद्युत उर्जा बचत पथदिवे संच बसविणे (सक्षमीकरण) | ३३०.०० |
| ६ | नगर पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिरापर्यंत रस्त्याचे पुलाच्या कामासह रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. | २९५.४६ |
| ७ | प्रभाग क्र.५१ व ५२ मध्ये ९.०० मी. उंचीचे ट्युबलर पोल अंडरग्राउंड वायरिंगसह उभारणे व १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींगा बसविणे | ११८.०० |
| ८ | लालटाकी नेहरु पुतळा ते सर्जेपुरा चौक ते रामवाडी ते फलटण पोलिस चौकीपर्यंत रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण आवश्यक त्याठिकाणी फुटपाथ व विद्युतीकरणासह करणे. | ३२४.५० |
| ९ | अमरधाम रस्त्यावरील वेताळबाबा मंदिर ते एम.एस.ई.बी. सबस्टेशन पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण विद्युतिकरणासह करणे. | ६३.८० |
| १० | प्र.क्र.१६ मध्ये झोपडीकॅन्टीन ते लक्ष्मीमाता मंदिरापर्यंत ९ मीटर उंचीचे टयुबलर पोल, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व अंडरग्राउंड वायरींग करणे. | १६.५० |
| ११ | अहमदनगर शहरालगतच्या राष्ट्रीय महामार्गावरील १) कायनेटीक चौक ते महामार्ग पोलीस चौकी २) डी.एस.पी.चौक ते औरंगाबाद रोड वरील मनपा हद्दीपर्यंत ३) पत्रकार चौक ते मनमाड नाक्यापर्यंत ४) अरणगाव | १५१.०० |

| | | |
|---|---|---|
| | चौक ते दौंड रोड वरील जकात नाक्यापर्यंत ५) नेप्ती चौक ते कल्याण नाक्यापर्यंत ६) गुलमोहर रोड पोलीस चौकी ते श्रीराम चौक ते भगवान बाबा चौक, निर्मलनगर ७)औरंगाबाद हायवे ते गांडुळ खत प्रकल्प ते राजळे बंगला ८) समतानगर पारिजात कॉलनी ते एकविरानगर ते तपोवन रस्ता ते शिरसाठ मळा रोडपर्यंत रस्त्याच्या मध्यभागी ९ मी. उंचीचे टयुबलर पोल, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व अंडरग्राउंड वायरींग करणे व औरंगाबाद रोड वरील लक्ष्मीनगर, हिम्मतनगर श्रीराम चौक ते वसंत टेकडी ते संदेशनगर अंतर्गत ४० वॅट टयुब फिटींग बसविणे, पोल उभारणे व स्ट्रीट लाईट कंडक्टर ओढणे. | |
| १२ | औरंगाबाद रस्त्यावरील वन विभागापासुन शहा शरीफ दर्गापर्यंत रुंदीकरणासह डांबरीकरण व विद्युतीकरण करणे. | १९२.५० |
| १३ | औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यंत रस्त्याचे रुंदीकरणासह डांबरीकरण करणे (सदर रस्त्यावरील पक्क्या घरांचे अतिक्रमण काढणे आवश्यक आहे.) | १०४.५० |
| १४ | मुकुंदनगर गोविंदपुरा ते कॅन्टोन्मेंट नाल्यापर्यंत आर.सी.सी.पाईपची गटार बांधणे. | ११०.०० |
| १५ | मनपा हद्दीतील प्रेमदान चौक, सक्कर चौक, एस.टी.स्टॅण्ड चौक, मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, अप्पु हत्ती चौक, राज चेंबर चौक याठिकाणी अद्यावत स्वयंचलित नविन सिग्नल बसविणे. | ३८.५० |
| | एकुण | ४९१९.१६ |

२) शासन निर्णयानुसार सदरची कामे हे प्रथमतः पुर्णतः सार्वजनिक खाजगी सहभागातुन (PPP) होणे बाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसे प्रयत्न यशस्वी न झाल्यास प्रकल्पांसाठी "ड" वर्ग महानगरपालिकेस ५०% अनुदान व ५०% कर्ज या तत्वावर मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे. तथापि अहमदनगर शहराच्या सर्व बाजुंनी सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत रिंग रोडचे काम BOT तत्वावर उभारण्यात येत आहे व त्या रोडवर टोल लागू होणार आहे. त्यामुळे सदरचे शहरातील अंतर्गत रस्ते विकसित करतांना कोणताही टोल लावण्यास वाव उरलेला नाही. त्यामुळे सदरचे सर्व अंतर्गत रस्ते हे सार्वजनिक खाजगी सहभागातुन विकसीत करणे शक्य होणार नाही. उपरोक्त सर्व प्रस्ताव हे शासकीय अनुदान व कर्ज या अंतर्गत शासनाकडे सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

३) सदर प्रकल्पाकरीता शासनाने ५०% अनुदान दिल्यास महानगरपालिका उर्वरित ५०% रक्कम महाराष्ट्र शासनाची मर्यादित कंपनी MUIDCL किंवा इतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन कर्ज उभारुन किंवा शासनाचे इतर योजना खालील अनुदान व इतर स्त्रोत यामधुन निधी उभारण्यास तयार असुन तसाही कर्जाचा प्रस्ताव करण्यासाठी हि सभा मान्यता देत आहे. तसेच सदर प्रकल्पाचा DPR तयार करणेत यावा. खर्च मंजूर तसेच तद्नुषंगिक खर्च मंजूर. सदर संपुर्ण प्रकल्प मा.शासन निर्णयानुसार राबविण्यासाठी येणा-या खर्चासही ही सभा मान्यता देत आहे.

४) सदर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राबविणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुधारणांचा अंगिकार करण्याचेही सभा ठरवते व सर्व सुधारणा करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. त्याबाबत मा.शासनाशी सामंजस्य करार करण्यासही सभा मान्यता देत आहे. व शासन निर्णयानुसार अनुदानास पात्र इतर क्षेत्राबाबत असलेल्या शासकीय विभागाकडे आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रस्ताव पाठविण्यासही सभा मान्यता देत आहे. त्याबाबतही Reforms, ५०% निधी कर्ज किंवा इतर माध्यमातून निधी उभारण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर भविष्यात हाती घ्यावयाचे प्रकल्प तयार करतांना DPR तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर. तद्नुषंगिक खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.शेख आरीफ शेख रफीयोद्दीन.

अनुमोदक :- मा.श्री.गाडे संजय बाबुराव.

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.